सात गावठी पि...

पुढारी दि 03/10/23

# ...अखेर पिस्टलचा 'सप्लायर' सापडला एलसीबीच्या जाळ्यात

## सात गावठी पिस्टलसह ११६ काडतुसे जप्त; चार जणांच्या आवळल्या मुसक्या




नांदेड,पुढारी वृत्तसेवा : पूर्ववैमनस्यातून हल्ला करणे, किरकोळ कारणावरून हाणामारीच्या घटनेमध्ये गोळीबार करणे असे प्रकार घडत असल्याने नांदेड कुप्रसिद्ध झाले आहे. पोलिसांनी अनेक वेळा पिस्टल जप्त करून आरोपींना अटक केली असली तरी पिस्टलचा सप्लायर पोलिसांच्या हाती लागत नव्हता. ही पिस्टले येतात कुठून याचे मूळ शोधून त्याला अटक करण्यात पोलिसांना यश येत नव्हते, मात्र क्राईम ब्रँचला पिस्टलचा सप्लायर शोधण्यात यश आले असून श्यामसिंग ऊर्फ श्याम्या या सप्लायरसह चौघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून सात पिस्टल आणि ११६ बुलेट जप्त करण्यात आल्या आहेत. सप्लायर्सचे रॅकेट उद्ध्वस्त केल्यानंतर पुढे तपासात डिलर्सपर्यंत पोहचू असा आशावाद पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार या राज्यातून हे पिस्टल नांदेडमध्ये आणून स्थानिकांना विक्री करणारे रॅकेट पोलिसांच्या कारवाईत उद्ध्वस्त झाले आहे. पिस्टल विक्रीचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांनी प्रयत्नांची शिकस्त केली. मागील चार ते पाच महिन्यांपासून या संबंधाने पोलिसांचे काम सुरू होते.

पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना शहरात पिस्टल खरेदी विक्रीची डिलींग होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी टीमसह त्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी फिल्डिंग लावली होती. सपोनि पांडुरंग माने, रवी वाहुळे, दत्तात्रय काळे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळ सापळा लावला होता. तिथे कमलेश ऊर्फ आशू पाटील, बलबिरसिंघ ऊर्फ शेरा, शेख शाहबाज शेख शकील, श्यामसिंग श्याम्या मतवाले हे चौघेजण डिलींग करण्यासाठी थांबले होते. त्यांना अटक करण्यासाठी पोलिसांचे पथक जाताच या चौघांनी या पथकावर हल्ला चढविला. पोलिसांनी तितक्याच चपळतेने हा हल्ला परतवून लावत आपल्या शस्त्राच्या बळावर चौघांच्याही मुसक्या आवळल्या.

त्यांच्याकडून ७ गावठी पिस्टल (अग्निशस्त्र) व ११६ जिवंत काडतुसे असा एकूण ३ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या चार जणांनी आशिष सपुरे व रबज्योतसिंघ ऊर्फ गब्या तिवाना रा.नांदेड यांच्यासह हैदराबाद येथे गावठी पिस्टल पुरविण्याचे कटकारस्थान रचले होते. त्यासाठी हे दोघेजण त्यांना पैसे पुरवठा करत असल्याची बाब तपासात आली आहे.